# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक १६/०१/२०२५ (गुरूवार) सकाळ

---

### ०३ दिवसात घरफोडीचा गुन्हा उघड
### बुट्टीबोरी पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेची कारवई

पोस्टे बुट्टीबोरी:—दि. १२/०१/२०२५ रोजी रात्री दरम्यान अनोळखी ०४ इसमांनी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीतील यातील फिर्यादी नामे अजिंक्य राजेश वानखेडे वय २५ वर्ष रा. बुटीबोरी ता.जि. नागपुर व शेजारील किराणा दुकानदार बबलू भोयर यांचे दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करून दोन्ही दुकानाचे गल्यातील नगदी ७० ते ७१ हजार रू रात्री दरम्यान ०४ अज्ञात इसमांनी चोरी करून चोरून नेले आहे. असा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम ३३१ (४),३०५(अ),३(५) भा. न्या.स अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

सदर गुन्हयाचा तपास बुटीबोरी पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर यांनी सुध्दा समांतर तपास सुरू केला. मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,(भा.पो.से) पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री. दिपक अग्रवाल (भा.पो.से) उपविभागीय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग नागपुर यांच्या मोखीक आदेशाने पोलीस स्टेशन बुटटीबोरी चे ठाणेदार प्रतापराव भोसले यांनी गुन्हे प्रगटीकरण शाखा पो.स्टे बुटटीबोरी चे अधिकारी व अमलदार यांचे सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी पथक गठीत केले. सदर पथकाने सदर गुन्हयातील ०४ अनोळखी इसम यांचा शोध तात्काळ सुरू केला. तांत्रिक पुरावे आणि गुप्तबातमीदाराच्या मदतीने अनोळखी ०४ इसम हे पोस्टे एम.आय.डी.सी नागपूर शहर हददीतील अमरनगर येथील असल्याचे विश्वसनीय खबरे वरून सदर ०४ इसमांचा शोध घेत असताना सदर इसम हे पोस्टे एम.आय.डी.सी नागपूर शहर हद्दीतील औदयोगीक क्षेत्रात एका बंद कंपनीच्या जवळ बसून असल्याची माहिती मिळाल्याने सदर इसम यांना पकडण्यास गठीत पथकातील अमलदार गेले असता एक **इसम नामे सिदधांत विरेंद्र गौस्वामी वय १९ वर्ष रा वार्ड नं ४ एम.आय.डी.सी हिंगणा जि.नागपूर हा मिळुन आल्याने** त्यास ताब्यात घेवून पो.स्टे चे गुन्हया संबंधाने विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हयातील ईतर तीन पाहीजे आरोपी नामे **१) मन चवरे २) अंकेश ऊर्फ टोबो पाल ३) विधी संघर्ष बालक यांच्यासह गुन्हा केल्याची माहीती हाती लागली. त्यानंतर त्याच परीसरात विधी संघर्ष बालक मिळुन आला.** आरोपीं कडून एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल किमती ३०,००० रू व गुन्हा करतेवेळी वापरलेली मोपेड गाडी किमती ५०,००० रू व नगदी रक्कम मिळून आली आहे तसेच सदर गुन्हयाचा समांतर तपासा दरम्यान **स्थागुशा नागपूर ग्रामीण शाखेच्या पथकाने** गुन्हयाचे तपासात गुप्त बातमीदाराचे माहीतीवरून तांत्रीक तपास करून गुन्हयातील आरोपी **अंकेश ऊर्फ टोबो रामसिंग पाल वय २२ वर्ष रा निलडोह यास ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून चोरी केलेल्या रकमेपैकी नगदी ३,८००/— रु जप्त करण्यात आले. आरोपीला** बुटटीबोरी पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. नमूद आरोपी अंकेश ऊर्फ टोबो रामसिंग पाल हा नागपूर शहर येथून तडीपार आहे. इतर एक पाहीजे आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर